1227

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. झोपुप्रा/तां-२/अंभोप्र/मा.क्र.२०१/७७७/२०२४
दि. १४/०३/२०२४.

## अंशत: भोगवटा प्रमाणपत्र (विक्री घटक विंग)

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

वाचा- १) प्रथम (मुळ) बांधकाम परवानगी क्र. ६९५ दि.१९/०४/२०१८
२) सुधारित बांधकाम परवानगी क्र. १०६० दि.१४/०९/२०२०.
३) सुधारित बांधकाम परवानगी क्र. २३४२ दि.३१/१२/२०२१.
४) सुधारित बांधकाम परवानगी क्र. ११५५ दि.१८/०८/२०२२.
५) सुधारित बांधकाम परवानगी क्र. १९१९ दि.१६/१०/२०२३.
६) विकसकाचा भोगवटा मिळणेकामीचा दि.१२/१२/२०२३ व दि.१२/०३/२०२४ रोजीचा प्रस्ताव
७) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता दि.१९ /०१/२०२४.
८) पुनर्वसन घटकासाठी दिलेले अंशत: भोगवटा प्रमाणपत्र दि.०७/०३/२०२४.

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ४५ प्रमाणे मौजे शिवाजीनगर, **भांबुर्डा फायनल प्लॉट.क्र.४८७/७,सि.स.नं. ११०८/७, पुणे** येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारतीस या प्राधिकरणामार्फत दि.१६/१०/२०२३ रोजी सुधारित बांधकाम परवानगी देणेत आली आहे. मंजूर बांधकाम परवानगीप्रमाणे इमारतीमधील विक्री घटक १५ मजल्यापैकी १२ मजल्यांचे बांधकाम पूर्ण झाल्याने योजनेचे विकसकाकडून उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार भोगवटासाठी प्रस्ताव प्राप्त आहे. योजनेच्या वास्तुविशारदांनी बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणित केले असल्याने,झोपु योजनेच्या इमारतीमधील **विक्री घटक** विंगच्या पूर्ण झालेल्या मजल्यांना पार्कीगसह मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मान्यतेनुसार अंशत:

भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे. मंजूर बांधकाम नकाशानुसार इमारतीमधील पूर्ण झालेला बांधकामाचा विक्री घटक विंगमधील मजलेनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

विक्री घटक विंग (Free Sale Wing) (एकूण १५ मजल्यांपैकी १२ मजल्यांकरीता)

| अ.क्र. | मजले | मंजूर नकाशानुसार विक्री घटक | | एकूण सदनिका / दुकाने |
|---|---|---|---|---|
| | | Resi. | Comm. | |
| १) | पार्किंग लेवल १ | पार्किंग + security cabin + Toilet | | पार्किंग पार्किंग + security cabin + Toilet |
| २) | पार्किंग लेवल २ | पार्किंग | | पार्किंग |
| ३) | पार्किंग लेवल ३ | पार्किंग | | पार्किंग |
| ४) | पार्किंग लेवल ४ | पार्किंग | | पार्किंग |
| ५) | पार्किंग लेवल ५ | पार्किंग | | पार्किंग |
| ६) | Ground floor Level १ | | ऑफिस क्र. ०१,०२,०३ | ०३ शोरूम |
| ७) | पहिला | | ऑफिस क्र. १०१ ते १०४ | ०४ ऑफिस |
| ८) | दुसरा | | ऑफिस क्र. २०१ ते २०४ | ०४ ऑफिस |
| ९) | तिसरा | | ऑफिस क्र. ३०१ ते ३०४ | ०४ ऑफिस |
| १०) | चौथा | | ऑफिस क्र. ४०१ ते ४०४ | ०४ ऑफिस |
| ११) | पाचवा | | ऑफिस क्र. ५०१ ते ५०४ | ०४ ऑफिस |
| १२) | सहावा (Refuge) | | ऑफिस क्र. ६०१ ते ६०३+Refuge Area | ०३ ऑफिस |
| १३) | सातवा (Recreational) | | ऑफिस क्र. ७०१, ७०३ आणि ७०४ + Recreational Floor | ०३ ऑफिस + Recreational floor |
| १४) | आठवा | | ऑफिस क्र. ८०१ ते ८०४ | ०४ ऑफिस |
| १५) | नववा | | ऑफिस क्र. ९०१ ते ९०४ | ०४ ऑफिस |

Slum Rehabilitation Authority, Technical Department, APPROVED, Pimpri Chinchwad Area

1225

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६) | दहावा | | ऑफिस क्र. १००१ ते १००६ | ०६ ऑफिस |
| १७) | अकरावा | | ऑफिस क्र. ११०१, ११०२A, ११०२B, ११०३ ते ११०८ | ०९ ऑफिस |
| १८) | बारावा | | ऑफिस क्र. १२०१, १२०२A, १२०२B, १२०३ ते १२०८ | ०९ ऑफिस |
| एकूण | | -- | ०३ शोरुम + ५८ ऑफिस | ०३ शोरुम + ५८ ऑफिस |

**विक्री घटक सदनिका :-**

निवासी विक्री सदनिका :- निरंक

बिगर निवासी सदनिका: - ०३ शोरुम + ५८ ऑफिसेस

**एकूण:- ०३ शोरुम + ५८ ऑफिसेस + security cabin + Toilet पार्किंगसह ( लेवल १ + लेवल २ + लेवल ३ + लेवल ४ + लेवल ५ )**

योजनेच्या इमारतीच्या बांधकामास योजनेचे संबंधित आर्कीटेक्ट यांनी दिलेले पूर्णत्वाचे प्रमाणपत्र व विकसकांनी दिलेले ना हरकत प्रमाणपत्र व विहित नमुन्यातील हमीपत्राचे आधारे खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून **अंशत: भोगवटा प्रमाणपत्र** देणेत येत आहे.

**अटी व शर्ती**

१) प्रस्तुत अंशत: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये वाढीव बांधकाम केल्याचे आढळून आल्यास,सदर बांधकाम अनधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार कारवाई करण्यात येईल.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

२) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

३) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तीचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

४) इमारतीचे सर्व बाजूंनी असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) कायम खुले ठेवणे बंधनकारक आहे.

५) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

६) विकास योजना रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र असल्याने संबंधित पुणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करून तसे, अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मागणीपूर्वी, प्राधिकरणास अवगत करावे.

७) अंशत: भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे चुकीची खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात आढळून आल्यास दिलेले भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

सोबत- नकाशे

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील
दि.१९/०१/२०२४ रोजीचे मान्यतेने

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

प्रभारी सहायक संचालक नगररचना
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र पुणे.

प्रत :- १) विकसक मे. नाईकनवरे बिल्डकॉन प्रा. लि. १२०४/४, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे -४२.
२) आर्कि. जी. एच. नाईकनवरे १२०४/४, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे -४२.
३) तहसिलदार,ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव.
४) संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे, यांना प्रत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.